महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.DGP-D२८A०१६/८/२०२४-DESK २८A (ई-१५९९४३) मुंबई, दि. स्वाक्षरीत नमूद.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे क्र.पोमसं/२८-अ/०३८/१/२०२४, दि.०५/०७/२०२४ चे इतिवृत्त.

**विषय** :- पुस्तक अनुदानात वाढ होण्याबाबत.

******

**परिपत्रक:-**

मा. पोलीस महासंचालक यांचे अध्यक्षतेखाली, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीची बैठक दि.१४/०६/२०२४ रोजी संपन्न झालेली होती. सदर बैठकीत "इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणा-या पाल्यांना देण्यात येणारे पुस्तक अनुदान रु.१३७५/- वरून रु.१५००/- व इयत्ता ११ वी व १२ वी पर्यंत शिक्षण घेणा-या पाल्यांना देण्यात येणारे पुस्तक अनुदान रु.२७५०/- वरुन रु.५०००/- करण्याबाबत" मुद्दा उपस्थित केलेला होता.

**२.** सदर मुद्याचे अनुषंगाने पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी / कर्मचारी यांच्या मुला- मुलींच्या तसेच लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी आणि राज्यातील विविध नक्षलवादी / अतिरेकी हल्ल्यातील शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची २ मुले यांच्या इयत्ता ५ वी ते १० व इयत्ता ११ वी ते १२ वी या अभ्यासक्रमाच्या पुस्तक अनुदानाच्या रक्कमेत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून खालील विवरणपत्रातील रकाना क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक अभ्यासक्रम | टक्केवारी | सध्याचे अनुदानाची रक्कम | वाढीव अनुदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत | ८५ % किंवा प्रमुख ६ विषयांमध्ये किमान अ-२ श्रेणी | रू.१,३७५/- | रू.२,०००/- |
| २. | इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यंत | ८०% | रू.२,५००/- | रू.३,५००/- |

**३.** तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी नियमावली, नियम क्र. ९ (१) (ब) (३) मध्ये दर्शविण्यात आलेल्या विवरणपत्रातील अ. क्र. १ व २ वरील अभ्यासक्रमाच्या, पुस्तक अनुदानाच्या रक्कमेमध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून, त्यानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून वाढीव पुस्तक अनुदान अदा करण्यात यावे.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 19-12-2024 15:54:20

**पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचे मान्यतेने.**

**(डॉ. निखिल गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई.

२/- (कृ.मा.प.)

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.,/ दहशतवाद विरोधी पथक / प्रशिक्षण व खास पथके /
रा.रा.पो. बल / वाहतूक / फोर्स वन / विशेष कृती / महिला व अत्याचार
प्रतिबंधक विभाग / लोहमार्ग, म. राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग / मोटार परिवहन विभाग, म. राज्य, पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)(बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म. राज्य, मुंबई / नक्षल विरोधी अभियान, म. राज्य, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर-मुंबई.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म. राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. १ ते १९.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / रा.रा.पो. बल केंद्र, नानवीज दौंड सह.
प्राचार्य, यु.ओ.टी.सी., नागपूर.
उप संचालक,डी. टी. एस., नाशिक.
पो.म.सं. कार्यालयातील विधी सल्लागार / विधी अधिकारी / वउपसहा., (नि.वे.) / आस्थापना-१.
पो.म.सं. कार्यालयातील स्वीय सहायक / लघुलेखक.
पो.म.सं. कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी (का. क्र. १ ते ४४)
(त्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून द्यावे.)

**प्रत:-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचे कार्यालय.

२/- पोलीस उप अधीक्षक यांनी सदरहु परिपत्रक पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

कार्यासन अधिकारी, का. क्र. ३६.